# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०७/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०५/०७/२०११ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. २८/०६/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ४. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ५. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ६. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ९. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १०. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| ११. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १२. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| २. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०५/०७/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७, दि. २८/०६/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, सभेला सुरुवात करण्याअगोदर इथे आपले सदस्य चंद्रकांत म्हात्रे काही कामानिमित्त प्रभाग ४ मध्ये जगदाळे म्हणून आपले प्रभाग अधिकारी आहेत ते त्यांच्याकडे गेले होते. बोलण्यामध्ये त्यांच काय झालं आपल्याला पूर्ण माहित नाही पण ते म्हणतात की, मी तसं म्हटलं नव्हतो आणि अधिकारी ने त्यांची लेटर हेड वर राईटींगमध्ये तक्रार केली पोलिस स्टेशनला एक गोष्ट पक्की आहे की, अधिकाऱ्यांकडे लोकप्रतिनिधी गेल्याशिवाय काय चर्चा होणार नाही आणि चर्चा करत असताना अशा पध्दतीचं कुठलं काही झालं असेल तर कमीत कमी आयुक्तांना सांगुन लोकप्रतिनिधींना सांगुन जसे महापौर आहेत तुम्ही आहेत, मा. सभापती आहेत, उपमहापौर साो. आहेत जी ठराविक मंडळी आहेत त्यांच्याशी अधिकाऱ्यांनी एकदा बोलून घेतलं असत जर यांची चूक असती तर त्यांना समजवता आलं असतं समजावण्या पलिकडे असते तर त्यांच्यावर निश्चितपणे पुढील कारवाई व्हायला पाहिजे. पण, अशा पध्दतीचं कुठली अगोदर चर्चा न करता जाऊन डायरेक्ट तक्रार करायची अशा पध्दतीने जर तक्रारी केल्या तर मला असं वाटतं की, या महापालिकेच्या हद्दीमध्ये आपण सदस्य म्हणून नगरसेवक म्हणून काम करणं कठिण होऊन जाईल. पोलिसांना नगरसेवक आले, तक्रार आली तर कामाला लावण्याची त्यांच्याकडे पुढची तयारी चालू असते. कोणी आपला हेतु पुरस्सर करतो, कोणी पोलिसांकडे जाऊन आपल्या परिसरातलं काम घेऊन गेलेला असतो. त्याच्यामध्ये काही पोलिस नाराज असु शकतात. मग, तो सगळा राग अशा माध्यमातून काढला तर लोकप्रतिनीधींना समाजामध्ये काम करणं

कठिण होऊन जाईल. म्हणून मा. सभापती साहेब माझी विनंती आहे की, त्या अधिका-यांना या ठिकाणी बोलवावं आणि या विषयावर आपण चर्चा करु. आजच्या सभेमध्ये एक विषय आहे. त्याच्यावर चर्चा करुन जो निर्णय सांगाल तसा आपण घेऊन टाकू.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. जगदाळेला बोलवलं आहे. तोपर्यंत आपण विषयाला सुरुवात करु ते आल्यानंतर आपण सविस्तर चर्चा करु.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, मला एक विचारायचं आहे. लेटरहेड वरती कंम्पलेन्ट करायला परवानगी घ्यायला लागते ना.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.४५, दि. ०४/०२/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, १ नंबर वर निवेदन केले होते की, जरा निवेदन केलं तर बंद होईल असे करा. तर बंद च्या ठिकाणी बर होईल असे करा. २ नंबर पान वर गाडी एकदम भरगच्च भरते. एकदम पाहिजे तर तिथे एक-दोन केलं आहे. पान नं.८ वर माझं संभाषण आहे. रिक्षा गॅरेज सुरु केलेलं आहे. तर खरच केले आहे. मा. सभापती साहेब, त्या गॅरेज बद्दल वारंवार तक्रार केलेली होती. मा. आयुक्त साहेबांकडे पण तक्रार केली होती तरी अजूनपर्यंत ते गॅरेज उचलेलं नाही. तिथे ऑईल वगैरे सांडलं तर ॲक्सीडंट जास्त होतात. त्यांच पूर्ण एक गॅरेज १०० ते ८० स्क्वे.फिट वर असेल तेवढीशी जागा रिकामी आहे. त्यांनी पूर्ण रस्ता कवर केलेला आहे. २५-२५, ३०-३० रिक्षा तिथे असतात तर तुम्ही काय कारवाई करणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

मध्यंतरी बैठक झाली होती त्यांनी कारवाईपण केली होती. तरी पण आज तुमच्यासमोर त्यांना कारवाई करायला सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आपल्या गिल्बर्ट मेंडोंसा साहेबांचा फोटो लावला आहे. एका दुकानावर तर त्यांना असं वाटते की, आम्ही राष्ट्रवादीचे आहोत म्हणून आम्हाला कोणी बोलणार नाही.

**मा. सभापती :-**

कुठलं गॅरेज?

**शशिकांत भोईर :-**

क्विन्स पार्क ला बिल्डींग आहे तिथे २-३ दुकान आहे. त्यांनी एका दुकानावर शेटचा फोटो लावलेला आहे. मी राष्ट्रवादीचा कार्यकर्ता म्हणून पण याच्यामुळे पक्षाचं नाव खराब होतो.

**मा. सभापती :-**

मी आदेश दिले आहे की, जे असेल ते काढून घेणे.

**शशिकांत भोईर :-**

९ नंबर पेज वर गेल्या मिटींगच इतिवृत्तांत होताना तर तिथे होता असं पाहिजे. १२ नंबर पेज वर माझं संभाषण वरुन तिसरं आहे. त्यांच्या ठरावावर स्थगिती आणली ना तर तिथे मंडल केलेले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, १७ नं. पेज पर देखिए। साहब को मेरी विनंती है की, मैने मिटींग मे बताया था हमारे उधर वॉर्ड ऑफिस मे कोई मरता नही है शहर मे मरता है बोला और इस बात पे कल मैने राऊत साहब से बात की थी। यह विषय इधर पास करने के लिए आया। वॉर्ड ऑफिसर को कल रात को फोन किया और कोई जवाब ही नही है। स्मशान बंद है। आज इधर मरने का लकडा जलानेका चिठ्ठी नही मिलेगा। मतलब आदमी हर महिने मे १५ दिन मे रहता नही है ऐसा मेरा कहना है। जभी फोन करते है उधर कोई आदमी नही है। कल रात को भी मयत हुआ था मैने भेजा तो उन्होंने बोला भाईंदर जाओ। तो वॉर्ड ऑफिस किस लिए है? तो फिर बंद करो ताला मारो। मा. सभापती साहेब, मेरी बात सही है ना। मैने फोन किया वॉचमेन ने उठाया और बोलता है साहब आज बंद है क्योकी आदमी आया नही। और मैने भी उस टाईम पे बोला था की, शहर मे कोई मरता है जाता है तो वहाँपर चिठ्ठी बनानेवाला हजर रहता नही है। गंभीर विषय है। २४ तास अपून लिखते है सबको बताते है की, वॉर्ड ऑफिस मे २४ तास चालू है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

त्या ठिकाणी एक एक्स्ट्रा माणूस संध्याकाळसाठी नेमू.

**चंद्रकांत मोदी :-**

यह विषय पत्रिका कौनसी तारीख का है? तभी बोला था अभीतक आदमी नही आया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

साहेब, कसं आहे की, दिवसभर माणूस आहे. संध्याकाळसाठी स्पेशल माणूस मागवू.

**चंद्रकांत मोदी :-**

रात को कोई आदमी नही रहता है। रात को बंद रहता है। राऊत साहब बहोत टेन्शन मे आये थे।

**रामनारायण दुबे :-**

साहब, कल की बात है, वहाँपर मृत्यु दाखला लेने के लिए गये थे तो पता लगा की वहाँपर जो आदमी बैठता है वह नही आया है इसिलिए यहाँपर कोई नही है। अगर वह आदमी नही आया तो दुसरे आदमी की व्यवस्था करनी चाहीए। ५ बजे वहाँपर कोई आदमी नही था। इसके बाद महानगरपालिका मे आकर दहन दाखला लेकर गया।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

साहेब, आपण मुख्य कार्यालयामध्ये ३ शिफ्ट मध्ये माणूस ठेवलेलं आहे. प्रत्येक ठिकाणी मुख्य लिपिक दर्जाचा अधिकारी ठेवला पण तेवढे लिपिक आपल्याकडे नाही. साहेब १२ महीन्यापासून एखादी अशी केस असते.

**चंद्रकांत मोदी :-**

यह प्रोसिडींग देड महिने पहले का है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

संध्याकाळी ७ वाजेपर्यंत कोणी ना कोणी असतेच.

**चंद्रकांत मोदी :-**

आरोग्यातला एक माणूस कमी कराना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

कुठला माणूस कमी करायचा?

**चंद्रकांत मोदी :-**

उधर आरोग्यवाला ही बैठता है दिन मे जो बैठता है वह भी आरोग्य वाला ही बैठता है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

ज्याला लिहिता येते, वाचता येते डॉक्टरचं सर्टीफिकेट वाचता येते असाच माणूस तिथे नेमायला लागतो.

**चंद्रकांत मोदी :-**

लेकीन उधर आरोग्यवाला ही बैठता है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो. ) :-**

काही अरेंजमेंट करुन घेऊ.

**राजेश म्हात्रे :-**

दि. ०४/०२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आह

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४५ :-**

दि. ०४/०२/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३६ :-**

दि. ०४/०२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. राजेश म्हात्रे** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.४६, वार्षिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २३/०६/२०११ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३८)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, मागील मिटींगमध्ये जेव्हा सुरुवात झाली त्यावेळी मोकळ्या जागेचा विषय काढलेला त्यावेळी मोकळ्या जागेवर जमा बाजु आहे ती निरंक दाखवलेली. एक पैसा जमा झाला नाही. तर त्यावेळी मी विचारलेल होत. नगररचना विभागातील धनेगावे साहेब होते. विजय पाटील साहेब गैरहजर होते.

तर त्यांनी किती लोकांना बिल दिले आणि किती वसुल झाली? त्याबद्दलचा आढावा पाहिजे होता की, ही वसुली झालेली आहे. याच्यात दाखवलेली नाही का? त्याची जर माहिती दिली तर बरं होईल.

**विजय पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो मोकळ्या जागेवरची जी वसुली आहे ती १ कोटी ५९ लाख ५३ हजार ४२८ रूपये आहे. आणि आमच्याकडे टाऊन प्लानिंग मधुन जी यादी प्राप्त झालेली आहे ती ७७ लोकांची झालेली आहे. ७७ बिल्डरसला ७७ खाते विकासक आहे त्यांना बिल बजावलेली आहेत. त्याचेतुन २ कोटी ६० लाख रू.वसुल झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

ती रक्कम किती होती? ७७ लोकांना बिल बजावलेली होती ती रक्कम किती होती?

**विजय पाटील :-**

२००८-०९, ०९-१०, १०-११ साठी.

**शशिकांत भोईर :-**

आपण ३ वर्षाची देतो का?

**विजय पाटील :-**

नाही. आपला जो ठराव झालेला आहे. त्या ठरावामध्ये आपण अस म्हंटलेल आहे की २००५-०६ पासून ज्यांना आपण ८.८ दिलेली आहे. बांधकाम प्रारंभ पत्र दिलेल आहे त्या सर्वांना आपण मोकळ्या जागेवरची कर आकारणी करायची आहे. त्याप्रमाणे जी यादी प्राप्त झालेली आहे. त्या यादी प्रमाणे ९ कोटी ९८ लाख रू. टोटल डिमांड आहे. आणि त्याच्यामधुन १ कोटी ६० लाख रू. वसुली झालेली आहे. आता सध्या ५-६ दिवसापूर्वी परत दुसरी एक यादी घेतली टाऊन प्लानिंग मधुन खातेदारांची. तर त्यांना आता बिल काढायच काम चालू आहे. उर्वरित जे खातेदार थकबाकीदार आहे. त्यांच्यावर जप्ती वॉरन्टची कारवाई करणार होतो.

**शशिकांत भोईर :-**

ही बिल दिली जे आपण कोणत्या-कोणत्या वर्षासाठी दिली? आणि मागील २०१०-११ एन्ड पर्यंत म्हणजे मार्च पर्यंत किती बॅलन्स होती? एवढी ९ कोटी ९८ लाख रू. होती.

**विजय पाटील :-**

साहेब, यांच्यामध्ये अस आहे की, टाऊन प्लानिंग मधुन ज्याप्रमाणे प्रारंभपत्र दिल जाते त्याप्रमाणे आम्ही बिल काढतो.

**शशिकांत भोईर :-**

पण, माझा प्रश्न असा आहे की, ३१ मार्च पर्यंत किती बिल दिली? ७७ लोकांना दिलेली की दुसऱ्या ८० लोकांना पण दिलेली?

**विजय पाटील :-**

३१ मार्च पर्यंत आम्ही ७७ लोकांना दिलेली.

**शशिकांत भोईर :-**

मग, त्यांची पैसे भरायची मर्यादा किती काळापर्यंत आहे.?

**विजय पाटील :-**

बिल मिळाल्यापासून १५ दिवसापर्यंत पैसे भरायचे.

**शशिकांत भोईर :-**

मग, त्यांनी भरले नाही. त्या जागेवर बिल्डींग पूर्ण झाली. तर त्याला भोगवटा दाखला देण्यात आला आहे का?

**विजय पाटील :-**

ज्यांना भोगवटा दाखला दिला आहे. सी.सी. टू ओ.सी. त्यांनी बांधकाम प्रारंभ पत्र दिलेल आहे. आणि भोगवटा दाखला घेतलेला आहे. याच्यामध्ये ज्यांना आपण बिल पाठवली आहे. एका विकासकाला बिल पाठवल.पण त्याने भोगवटा दाखला घेतलेला आहे. तो विकासक जो आहे तो आम्हाला सी.सी. दाखवतो. आणि त्याप्रमाणे आम्ही समजा जास्तीची आकारणी केली असेल तर कमी करून भोगवटा दाखलाची वसुली करतो. उदा. डी.पी. रिलायटीज आहे. हे लोक पैस भरतात त्यानंतर लोढा कॉम्प्लेक्स आहे तो हायवेला आहे. त्यांनी पैसे भरलेले की त्यांनी भोगवटा दाखला आहे. तो पर्यंत त्याच्याकडून पैसे घेतलेले आहे. त्याच्यानंतर घरपट्टी कराची आकारणी चालू होते.

**शशिकांत भोईर :-**

माझा असा प्रश्न आहे की, ७२ लोक होतो. त्याच्यात किती लोकांना भोगवटा दाखला देण्यात आला. आणि त्याच्यातुन किती लोकांनी पैसे भरलेले आहे? की, भोगवटा दाखला घेतला आणि पैसे भरले. ज्यांनी पैसे भरले नाही तरी भोगवटा दाखला घेतलेला आहे असे किती लोक आहेत?

**विजय पाटील :-**

साहेब, ही माहिती मी तुम्हाला पुढच्या वेळेला देतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, गेल्या मिटिंगला ते नव्हते पण पूर्ण माहिती आणायला पाहिजे होती. साहेब, याच्यात फक्त एक कोटी रू. दाखवलेली होती. याच्यात १० कोटी रू. ची रक्कम निघाली. हा हलगर्जी पण आहे. आपल्या प्रशासनातर्फे मी यांच्यावर खरोखर आरोप ठेवेन. कारण १० कोटी रूपये जर १० कोटी रू. आपल्या प्रशासनाला मिळाले असते. तर अन्य विकासाची कामे झाले असती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, आपण बिल पाठवली. बिल पाठवल्यानंतर जर बिल भरत नसेल तर त्याला पॅनल्टी लागते. त्याला व्याज लागते बिल एकदा पाठवल्यानंतर मिटर सुरू होते. मग कुठे ही जावु शकत नाही. नाहीतर इतरत्र प्रॉपर्टी असते. दुसऱ्या ठिकाणी बांधकामचे प्रपोजल गेले असतील टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटला पत्र देवून जो पर्यंत मागची वसुली करणार नाही. तो पर्यंत आम्ही बिल्डींग प्लान पास करणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तस नाही माझा प्रश्न असा होता की, भोगवटा दाखला घेतला होता. परंतु, बिल भरल नसेल मोकळ्याजागेच. तर, त्याच काय? तो माझा प्रश्न आहे. विकासकाने भोगवटा दाखला घेतला असेल आणि त्यांनी मोकळ्या जागेचा कर भरलाच नसेल मग त्याच काय प्रशासनाने भोगवटा दाखला दिलाच कसा?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

भोगवटा दाखला जर दिला असेल तर तपासून घेवू.

**शशिकांत भोईर :-**

किंवा त्यांनी तपासायला पाहिजे होता. ज्यांनी मोकळ्या जागेवरील कर भरलाय की नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जरी भोगवटा दाखला दिली असला जर त्याठिकाणी वास्तव्य करत असतील तर त्याच पाणी खंडीत करून पैसे भरल्यापर्यंत पाणी चालू करणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

या भूलथापा असतात ना की, आम्ही कनेक्शन कापू पैसे भरले नाही. तर हे तर आपण ३१ मार्चच्या पूर्वी पण करतो ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आता ही करू शकतो.

**शशिकांत भोईर :-**

जे नागरिक पैसे भरतात त्यांना पण आपण पहिला करतो ना. आता का करायच? आमचे जे अगोदरचे स्थायी समितीचे सदस्य होते. याच्यात कोणी असतील त्यांनी एक कोटी रू. ची तरतुद दिलेली ही १० कोटी रू. ची आहे. त्यांना हा प्रश्न विचारता आला नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हा नविन कर आहे. आपण आता रिसेन्टली सुरू केलल आहे.

**शशिकांत भोईर :-**

नविन कर नाही. हा तीन वर्षापूर्वी वक्तव्य केलेल आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण व्याजासहित त्याचे वसुल करतो.

**शशिकांत भोईर :-**

पानपट्टे साहेब, याच्याने तुमची वसुली होणार नाही. प्रत्येकाला व्याज लावल म्हणून तुमची वसुली झाली. अस नाही. माझा प्रश्न असा आहे की, ज्या विकासकाने भोगवटा दाखला घेतला परंतु, मोकळ्या जागेवरील कर भरला नाही. त्याच्यावर काय ॲक्शन घेणार? मा. सभापती साहेब, याच्यावर तुम्ही रूलिंग द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ऑफिशियल प्रोसिजर असल्याने शट डाऊन करणार.

**शशिकांत भोईर :-**

मी मागच्या मिटींग मध्ये मी प्रश्न विचारला होता. त्याची पूर्ण तयारी करून यायला पाहिजे होत ना. का तयारी करून आले नाही. मला ही माहिती रितसर पाहिजे.

**विजय पाटील :-**

आम्ही ही माहिती तुम्हाला रितसर देतो.

**शशिकांत भोईर :-**

हा प्रश्न आहे ना तो स्थगीत ठेवतो.

**विजय पाटील :-**

प्रश्न स्थगित नका ठेवू. आम्ही आमची कारवाई करतो तुम्हाला जी माहीती भोईर साहेबांना पाहिजे ती इतंभुत माहिती ज्यांना बिल दिलेली आहेत, बिल बजावलेली आहेत. आणि ज्यांची थकबाकी आहे आणि कोणी

भोगवटा दाखला घेतलेला आहे किंवा नाही याची माहिती तुम्हाला इमेजिटली दिली जाईल. अगदी १०० टक्के दिली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

इथे नगररचना विभागाचे कोणीतरी अधिकारी असतील तर त्यांना माहीत असेल ना. की, भोगवटा दाखला घेतलेल आहे किंवा मोकळ्या जागेवरील कर कोणी भरलेला आहे की नाही. कारण, भोगवटा दाखला ते देतात तुम्ही देत नाही.

**विजय पाटील :-**

धनेगावे साहेब आज मंत्रालयात मिटिंग मध्ये घेतलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

ठिक आहे. तो पर्यंत हा विषय पेन्डींग ठेवा.

**विजय पाटील :-**

पेन्डींग नका ठेवू. माझी विनंती आहे की, याच्यामध्ये ज्यांनी भोगवटा दाखला घेतलेला आहे त्याची सगळी माहिती ....

**शशिकांत भोईर :-**

याच्यावर चर्चा झाली पाहिजे.

**मा. सभापती :-**

याच्यावर चर्चा करायची आहे. सर्वांची संमती आहे का चर्चा करायला? विषयाबद्दल बोलायच आहे. हा विषय पुढे घ्या.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही सविस्तर माहिती आणा.

**विजय पाटील :-**

ठिक आहे.

**शशिकांत भोईर :-**

कारण, याच्यामध्ये तुम्ही जर बजेट बघितला तर कमीत कमी ३५ ते ४० टक्के फरक मागच्या बजेट पेक्षा तुम्ही बघितल का? माझा दुसरा प्रश्न आहे. टॅक्स मध्ये सर्वसाधारण कर आपण किती लोकांना बजावलेली बिलं तुम्ही घरपट्टी कर घेता ना.

**शरद बेलवटे :-**

सन्मा. सदस्य भोईर साहेब, तुमच्याकडे हा जो आढावासाठी विषय आलेला आहे हा स्टँडींग ने ३० जून पर्यंत मंजूर करुन मला ते वेब साईट वर टाकायचं असंत त्यासाठी तुमच्याकडे विषय आलेला आहे. तुम्हाला यातले जे काही मुद्दे आहेत ते मुद्दे तुम्हाला डिस्कस करायचे असतील त्रैमासिकच्या वेळेला सुध्दा तुम्ही आढावा घेऊ शकता.

**शशिकांत भोईर :-**

मला तसा आढावा घ्यायचा नाही. साहेब, तुम्हाला सांगतो ज्याच्यामध्ये संपूर्ण माहिती नसल्यामुळे अपूर्ण माहिती असल्यामुळे हा घोळ होतो. माझा प्रश्न असा आहे तुमही सन २०१०-११ मध्ये किती तुम्ही मालमत्तेला कर लावला? तो फिगर पाहिजे होता मागच्या त्याच्यात किती बॅलेंन्स होते ती फिगर पाहिजे होता. आता आमच्या सभासदांनी किंवा सभापती तत्कालीन त्यांनी ५० कोटी रुपये दिलेलं होतं. मग, त्याच्यानंतर जास्त होता की, कमी होता ते पण माहित पडला पाहिजे की नाही. आता तुम्ही ९ कोटी ४१ लाख रुपये कमी दाखवले म्हणजे वसुली झाली नाही त्याच्या अगोदरची वसुली किती बाकी होती? ती एकत्र करुन माहिती पडल पाहिजे ना आपण अहवाल घेतो ना.

**शरद बेलवटे :-**

वसुलीचा आढावा तुम्ही तो एक स्पेशल सब्जेक्ट घेतला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

मग, हा काय सब्जेट नाही?

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहेब, पिछले मिटींग मे इसी विषय के लिए सभी जानकारी लेने के लिए रखा था ना।

**शरद बेलवटे :-**

सर, म्युनिसिपल अकाऊंट कोड १९७१ मध्ये येईल ते नियम आहे त्या नियमामध्ये स्टँडींग ने वेळोवेळी ज्या मंजू-या दिलेल्या आहेत आणि आपल्याकडे जे इंन्कम आलेले आहे त्यातुन जे पेमेंट झालेलं आहे त्याचा आढावा याच्यामध्ये आलेला आहे आणि याला स्टँडींग ने हे केल्यानंतर मी वेब साईट वर टाकण्यासाठी.

**मा. सभापती :-**

स्टँडींग ने हे केलं म्हणजे काय? मंजूरी दिली पाहिजे की काय?

**शरद बेलवटे :-**

स्टँडींग ने फक्त आढावा घेतला आणि मंजूरी दिली त्यानंतर मी ते वेब साईट वर टाकणार.

**मा. सभापती :-**

मंजूरी द्यायला त्याचा आढावा घ्यायला रितसर त्याची माहिती पाहिजे की नाही?

**शरद बेलवटे :-**

यामध्ये तुम्हाला ज्या ज्या ठिकाणी तुम्हाला कमी दिसते ना त्या ठिकाणच्या सगळ्या ह्याची वसुली आढावा एक वेगळी बैठक सगळ्या माहिती सकट बोलवावी त्यांच्या कडचे सगळे रेकॉर्ड येईल.

**लक्ष्मण जंगम :-**

विषय असा आहे की, तुम्ही म्हटलं चर्चा करा आणि मंजूरी देऊन टाका.

**शरद बेलवटे :-**

तसं नाही ऑलरेडी तुम्ही मंजूरी त्रैमासिकला देत आले आहात. स्टँडींग मध्ये तुमचे जे काही ठराव मंजूर होतात काम मंजूर होतात त्या आलेल्या ह्याच्यातुनच मी पेमेंट करणार ना.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही आलेल्यातुन पेमेंट केलं तो विषयच नाही. आले का नाही त्याच्यासाठी चर्चा आहे. आता एक गोष्ट तुम्ही सांगता का? की, आता इथे मंजूरी दिल्यावर जे येणं आहे ते एवढया वेळेत येईल असं काय तुमच म्हणनं आहे का?

**शरद बेलवटे :-**

नाही, प्रॉपर्टी टॅक्स, उपकर, हे जे होर्डींग्ज आहेत...

**स्नेहा पांडे :-**

साहब, २३ तारीख को यह विषय इसिलिए पोस्टपोन किया था की, अगले मिटींग मे चर्चा विस्तार से करेंगे। विजय पाटील साहब उसदीन नही थे आज भी यही रहेगा तो फायदा क्या आज की मिटींग का? इसी विषय के लिए आज की मिटींग रखी गयी है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्ही याला मंजूरी  द्या. विषय पत्रिकेवर विषय घ्या त्या संदर्भात नंतर चर्चा करता येते ना. तुम्ही याला मंजूरी द्या.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, आता बेलवटे साहेबांना जे आम्ही म्हटलं ते म्हणण्याच्या पाठचा उद्देश असा होता, ते तुमच्या बोलण्यामध्ये आलं की आमची प्रोसेस चालू आहे. तर तुम्ही इथे असं सांगा की, आम्ही प्रोसेसला सुरुवात केली तेवढा वेळ लागतो. पण एवढ्या वेळानंतर हे पूर्ण वसुल होणार. आम्हाला हेच तर ऐकायचे आहे संपला विषय आता भरलेले नाही पण प्रोसेस केल्यानंतर ते सगळे पैसे येणार नाही अशी माहिती तुमच्याकडुन मिळाल्यानंतर विषय संपतो आता इथे चर्चा करत असताना कुठलेही सदस्य किंवा सगळे मिळून किंवा आपण सगळे मिळून असं नाही ठरवणार की उद्याच विजय पाटील तुम्ही जाऊन सगळ्यां टॅक्सचे पैसे घेऊन या तसं तर होणार नाही समोरचे पैसे भरील तेव्हा तुम्ही येणार त्याच्यासाठी तुमची जी कामं प्रोसेस आहेत ते तुम्ही करणार आहे जी काय कारवाई करायची ती करणार आहे. मग, नोटीस असु द्या. पुढे काय लिलाव असेल जे असेल ते पण जे करत असताना एवढा वेळ आपल्याला लागेल. आणि एवढ्या वेळामध्ये आपली वसुली होईल असं तुम्ही म्हटलं विषय संपला अशी कुठलीतरी माहिती ठोस नसायला पाहीजे ती तुमच्याकडुन आणि अधिका-यांकडुन ही माहिती अधिका-याने व्यवस्थित दिली तर.....

**मा. सभापती :-**

हा विषय पेंडींग ठेवण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझा विषय आहे. स्थानिक संस्था कर बद्दलचा की, इथे स्थानिक संस्था कराबद्दल कोण सक्षम अधिकारी आहे ना तो आम्हाला पाहिजे कारण आपल्या महापालिकेची प्रत्येक महापालिकेमध्ये चर्चा होते की, त्यांनी चांगल्याप्रकारे वसुली केली आणि आपला विषय घेतात त्याच्याबद्दल मला चर्चा करायची आहे सक्षम अधिकारी कोण आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

राऊत साहेब आहेत पण आज राऊत साहेब मंत्रालयात मिटींगला गेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मग हा पण विषय पेंडींग ठेवायला लागेल तुम्ही जर जबाबदारी घेत असाल तर मी त्या विषयावर चर्चा करतो.

**दिनेश नलावडे :-**

पानपट्टे साहेब, जबाबदारी घेऊ शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, अपूर्णच आहे पुढच्या पण विषयावर बोलायचे आहे. बरेच विषय आहे. अनधिकृत बांधकाम तोडलं त्याच्यावर बोलायच होते त्याच्यावर किती पैसे जमा करायचे होते? बरचे पैसे निघालेले की, ही बिलं वसुली नाही झाली.

**मा. सभापती :-**

पुढच्या वेळेला रितसर विषय विषयपटलावर येऊ द्या मग आपण चर्चा करु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही सांगाल ते तुम्हाला सांगितल की तहकुब ठेवा पुढच्या मिटींगला ठेवू.

**मा. सभापती :-**

आजची मिटींग तहकुब करतो येत्या शुक्रवारी ११.०० वाजता मिटींग ठेवू.

**शशिकांत भोईर :-**

अधिका-यांना सांगा की, सगळे मिटींगमध्ये सर्व माहितीनिशी हजर राहिले पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सर्व अधिकारी सर्व माहितीसह मिटींगमध्ये उपस्थित राहतील.

**शशिकांत भोईर :-**

तसेच राहीले तर त्याच्यावर काय कारवाई करायचे ते बघा तुम्हाला कारवाई करायला लागेल.

**मा. सभापती :-**

तुम्ही रितसर त्यांना माहिती द्या आणि मिटींगमध्ये सर्व हजर पाहिजेत. नंतर बोलू नका की, हा अधिकारी नाही तो अधिकारी नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जो येणार नाही त्यांना नोटीस देणार.

**मा. सभापती :-**

ठिक आहे आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ दुपारी १२.३० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**